# मेट्रोसाठी खोदकामाला वेग

## सव्वा किमीचा बोगदा खणला

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ प्रकल्पाने वेग घेतला असून, आतापर्यंत एकूण ३४.५ किमीच्या मार्गापैकी १२६७ मीटरचा बोगदा खोदण्यात आला आहे. या कामासाठी ११ टनेल बोअरिंग मशिन आणण्यात आल्या असून, सध्या आठ मशिन प्रत्यक्ष बोगदा खोदण्याचे काम करत आहेत.

मेट्रो मार्गाच्या खोदकामासाठी १७ मशिन मागवण्यात आल्या. त्यापैकी ११ प्रकल्पस्थळी आहेत. यामधील आठ मशिनमार्फत काम सुरू आहे. उर्वरित मशिनच्या चाचण्या पूर्ण झाल्या असून, त्या जुलै, २०१८पर्यंत कार्यरत होतील, अशी माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी दिली.



### खोदकाम झाले वेगवान...

**सर्व मशिनना महाराष्ट्रातील वैतरणा, सूर्या, तानसा, कृष्णा, गोदावरी, तापी आणि वैनगंगा नद्यांची नावे देण्यात आली आहेत. नोव्हेंबर, २०१७ रोजी पहिली मशिन प्रकल्पस्थळी आणण्यात आली.**

- **आझाद मैदान प्रकल्पस्थळः** वैतरणा १ व २ या मशिन येथे कार्यरत असून, त्या ग्रँट रोडपर्यंत ४.५ किमी पट्ट्यात खोदकाम करीत आहेत. आतापर्यंत ३३० मीटर लांबीचे खोदकाम पूर्ण.
- **नया नगर प्रकल्पस्थळ :** कृष्णा १ व २ या मशिन येथून दादर मेट्रो स्थानकापर्यंत खोदकाम करीत आहेत. ४९२ मीटरचे काम पूर्ण.
- **विद्यानगरी प्रकल्पस्थळ :** गोदावरी १ व २ या मशिन आंतरदेशीय विमानतळापर्यंत काम करीत असून, १५० मीटरचे काम पूर्ण.
- **मरोळ नाका प्रकल्पस्थळ :** वैनगंगा १ व २ या मशिन आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत काम करीत असून २९५ मीटर खोदकाम पूर्ण.